# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६

☎(020)25656234, FAX : (020)25656234

ईमेल : ropune.dte@gmail.com संकेतस्थळ : www.ropune.org.in


जा.क्र. तंशिविकापु/संवि/2016/4797 दिनांक : 28 NOV 2016

प्रति,

संचालक / प्राचार्य,

सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था, पुणे विभाग

विषय :- राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ति (EBC) योजने बाबत (२०१६-१७).....

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक टीईएम -2015/प्र .क्र.219/तांवि-4 दिनांक ३१ मार्च, २०१६

२. शासन निर्णय क्रमांक टीईएम-2016/प्र.क्र.501/ तांशि-4 दिनांक १३/१०/२०१६

३. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक १५/तंशिसं/अर्थसं/ईबीसी नि.वि./२०१६-१७/१६२ दिनांक २४/११/२०१६

महाराष्ट्र शासनाने राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ति योजना (EBC) राबविणे संदर्भात उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय निर्गमित केले आहेत. या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाने सदर योजनेकरीताचे वेळापत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केले आहे. तसेच उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.३ नुसार सदर योजनेचा लाभ दिनांक ०५/१२/२०१६ पर्यंत देणे बाबत सुचित केलेले आहे. त्यामुळे या कार्यालयाकडुन विद्यार्थ्यांच्या अर्जावर मंजुरीबाबतची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येणार आहे.

सर्व संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, संस्थेच्या लॉगीनमधून शिक्षणशुल्क समिती द्वारे मंजूर झालेल्या शैक्षणिक शुल्काबाबतची वर्षनिहाय अभ्यासक्रम निहाय माहिती तातडीने भरण्यात यावी. शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ करीता शिक्षण शुल्क समिती द्वारे फी मंजूर झालेली नसल्यास शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ या वर्षासाठी मंजूर शैक्षणिक शुल्क भरण्यात यावे किंवा ॲडहोक फी भरण्यात यावी. शैक्षणिक शुल्काबाबतची माहिती संस्थेने भरणे आवश्यक असुन सदरची माहिती दिनांक ०१/१२/२०१६ पर्यंत भरण्यात यावी अन्यथा संबंधित संस्थेच्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुर केले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

त्याचप्रमाणे तांत्रिक अडचणीमुळे विहित मुदतीमध्ये अर्ज करु न शकलेल्या पात्र विद्यार्थ्यांचा एकत्रित प्रस्ताव *आवश्यक कागदपत्रांसह* या कार्यालयास दिनांक ०१/१२/२०१६ पर्यंत *हस्तदेय* सादर करावा. सदर मुदतीनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी तसेच कोणताही पात्र लाभार्थी अर्ज करण्यापासुन वंचित राहणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

Gaikwad 28.11.16

सहसंचालक/करिता

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे